आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 06.11.2026 **वार : शुक्रवार**

ठळक बातम्या

1. आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी कोट्यवधी देशवासियांची मनं जिंकल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
2. नवीकरणीय ऊर्जेतील कामगिरीसाठी महाराष्ट्राला राष्ट्रीय पुरस्कार.
3. युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर'मध्ये पुण्यातील भांडारकर संस्थेतल्या महाभारताच्या हस्तलिखिताचा समावेश.
4. आशियाई हॉकी स्पर्धेत भारताला सलग तिसरं अजिंक्यपद.

सविस्तर बातम्या

आशियाई पॅरा क्रीडा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत सहभागी भारतीय खेळाडूंशी दिल्लीत संवाद साधला. भारतीय खेळाडूंनी आपल्या कामगिरीने केवळ पदकंच नाहीत, तर कोट्यवधी देशवासियांची मनं जिंकल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. खेळाडूंची ही कामगिरी भारतीय क्रीडाविश्वात एक मोठी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं ते म्हणाले. आगामी ऑलिम्पिकचा विचार करून तरुणांनी क्रीडा प्रतिभेच्या शोध मोहिमेत सहभागी व्हावं असं आवाहनही पंतप्रधानांनी केलं. 2014च्या 3 सुवर्ण पदकांच्या तुलनेत यंदा जिंकलेली 30 सुवर्णपदकं हे भारताच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचं द्योतक असल्याचं, केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यावेळी म्हणाले.

ऊर्जा परिषद

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत काल 'भारत अक्षय ऊर्जा परिषद आणि प्रदर्शन 2026' या परिषदेचा समारोप झाला. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्राला राष्ट्रीय पातळीवर दुसरा क्रमांक मिळाला. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या सोहळ्यात ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी राज्याच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. देशाची बिगर जीवाश्म इंधन क्षमता आता 300 गिगावॅटहून जास्त झाली असून, भारतानं जीवाश्म इंधनावरील आपलं अवलंबित्व यशस्वीपणे कमी केलं असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपतींनी यावेळी बोलताना केलं.

हरित ऊर्जा गुंतवणुक

भारतानं 2030 पर्यंत बिगर-जीवाश्म इंधनापासून 190 गिगावॉट वीज निर्मितीसाठी ठेवलेलं 220 अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीचं उद्दिष्ट पार होईल, असा विश्वास केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी यावेळी व्यक्त केला. गेल्या दशकात भारताच्या अक्षय ऊर्जा क्षेत्रात 15 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक झाली असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली. सध्या देशात बिगर-जीवाश्म इंधनापासून 310 गिगावॉट वीज निर्मिती होत असून 2030 पर्यंत 500 गिगावॉटचे उद्दिष्ट गाठलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

कोळसा आणि खनिज

देशात लवकरच कोळसा आणि खनिज एक्सचेंज सुरू करण्याची योजना केंद्र सरकार आखत आहे. याचं 90 टक्के काम पूर्ण झालं आहे, अशी माहिती केंद्रीय कोळसा आणि खाणमंत्री जी. किशन रेड्डी यांनी दिली. दक्षिण गोव्यात आयोजित खाण आणि कोळसा क्षेत्रातील सुधारणांवरील चौथ्या परिषदेत ते बोलत होते.

या प्रणालीमुळे कंपन्या आणि व्यापाऱ्यांना एकाच व्यासपीठावर कोळसा आणि खनिजांची खरेदी-विक्री करता येईल. यात लोखंड, चुनखडी, बॉक्साईट, कोळसा आणि इतर महत्त्वाच्या खनिजांचा समावेश असेल.

डिजिटल लाइफ सर्टिफिकेट

कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह आज नवी दिल्ली इथं 'डिजिटल लाइफ सर्टिफिकेट' मोहिमेच्या पाचव्या आवृत्तीचा प्रारंभ करणार आहेत. ही मोहीम महिनाभर चालणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून 'जीवन प्रमाण' ॲपद्वारे निवृत्ती वेतन धारकांसाठी 'हयातीचा दाखला' सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, सोयीस्कर आणि सोपी करण्याच्या उद्देशानं हा उपक्रम राबवला जात आहे. वयोवृध्द निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या घरीदेखील ही सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस-आवाहन

दीपावलीच्या प्रकाश पर्वातील धनत्रयोदशीचा सण आज देशभरात उत्साहात साजरा होत आहे. आजच्याच दिवशी आयुर्वेदाचे जनक भगवान धन्वंतरी यांचं पूजन केलं जातं. यंदा राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व मंत्र्यांनी दिवाळीचा एक दिवस एखाद्या गावात जाऊन शेतकरी कुटुंबांसोबत साजरा करावा, असं आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत बोलताना केलं.

अयोध्या दीपोत्सव

अयोध्येत सहाव्या वार्षिक दीपोत्सवाला काल सुरुवात झाली. या निमित्तानं अयोध्येतील नद्यांचे घाट काल लाखो दिव्यांच्या प्रकाशानं उजळून निघाले होते.

UGC

विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजे UGC च्या 2026 च्या समानता नियमनांची फेरतापासणी करण्यासाठी केंद्र सरकार एक विशेष समिती स्थापना करणार असल्याची माहिती केंद्र सरकारच्या वतीनं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी काल सर्वोच्च न्यायालयाला दिली. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी हे नियम आखले गेले आहेत असं सांगण्यात आलं. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण होणं आवश्यक असल्याचं या सुनावणी दरम्यान सरन्यायाधीशांनी स्पष्ट केलं.

मेमरी ऑफ द वर्ल्ड

युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर'मध्ये पुण्यातल्या भांडारकर संस्थेतील महाभारताच्या हस्तलिखिताचा समावेश झालेला आहे. या सूचीत आजवर समाविष्ट झालेल्या भारतातील 17 ग्रंथांपैकी 6 ग्रंथ भांडारकर संस्थेमधील आहेत. 358 पानांचं हे हस्तलिखित इसवी सनाच्या सोळाव्या शतकातील असून ते भूर्जपत्रांवर शारदा लिपीत लिहिलेले आहे. हे हस्तलिखित जॉर्ज ब्यूह्लर या विद्वानानं 1875 साली काश्मीरमधून मिळवलं होतं. हे हस्तलिखित, भांडारकर संस्थेनं प्रकाशित केलेल्या महाभारताच्या संशोधित आवृत्तीचा मूलाधार आहे. इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे काल रोजी झालेल्या युनेस्कोच्या बैठकीमध्ये महाभारताबरोबरच म्हैसूर येथील कौटिलीय अर्थशास्त्र आणि काश्मिरातील राजतरंगिणीचे हस्तलिखित यांचाही समावेश या रजिस्टर मध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी समाज माध्यमावरुन ही माहिती दिली.

जयशंकर-अँटिगा दौरा

भारतानं गयानाला रस्ते, आरोग्यसेवा आणि संरक्षण प्रकल्पांसाठी 500 दशलक्ष डॉलर्सचा निधी कर्ज स्वरुपात देण्याची घोषणा केली आहे. अँटिगा आणि बारबुडा येथील सेंट जॉन्समध्ये कॉमनवेल्थ राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी गयानाचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद इरफान अली यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.

डॉ. एस. जयशंकर यांनी अँटिगा आणि बारबुडाचे पंतप्रधान गॅस्टन ब्राऊन यांचीही भेट घेतली. या वेळी दोन्ही देशांमधील व्यापार, गुंतवणूक, नूतनीकरणक्षम ऊर्जा आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. डॉ. जयशंकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वतीनं गॅस्टन ब्राऊन यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रकुल देशातील उद्योजकांच्या बैठकीत बोलताना डॉ. जयशंकर यांनी पुरवठा साखळी मजबूत करणे आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर दिला. दोन्ही देशांमध्ये डिजिटल पेमेंट प्रणालीसह 3 करारांवर स्वाक्षरी झाली.

व्हिसा अटी बदल

देशात वास्तव्याला असलेल्या अनेक श्रेणींमधील परदेशी नागरिकांसाठी पासपोर्ट आणि व्हिसाच्या अटी केंद्र सरकारनं शिथिल केल्या आहेत. यात, काही विशिष्ट पाकिस्तानी नागरिक, अल्पसंख्याक निर्वासित, नोंदणीकृत श्रीलंकन तमिळ आणि तिबेटी नागरिकांचा समावेश आहे. गृह मंत्रालयाच्या अधिकृत राजपत्रात ही माहिती देण्यात आली आहे. सुधारित तरतुदींनुसार, नेपाळ किंवा भूतानला जमिनीमार्गे किंवा हवाई मार्गाने प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांना पासपोर्ट बाळगण्यापासून सवलत देण्यात आली आहे. मात्र, त्यांना अधिकृत ओळखपत्रांपैकी कोणताही एक दस्तऐवज सादर करावा लागेल, तसंच विचारण्यात आलेली माहिती देणं देणे बंधनकारक असणार आहे.

शेअर बाजार-तेजी

जागतिक स्तरावरील सकारात्मक संकेतांमुळे देशांतर्गत शेअर काल बाजारात तेजी दिसून आली. सेन्सेक्स 2009 अंकांनी वाढून 79 हजार 310 अंकांवर बंद झाला, तर निफ्टी 576 अंकांनी वाढून 24 हजार 537 अंकांवर स्थिरावला. दोन्ही निर्देशांकांनी सलग सहाव्या सत्रात आपली दमदार कामगिरी कायम ठेवली.

विश्व अजिंक्यपद नेमबाजी

दोहा येथे सुरू असलेल्या आय एस एस एफ विश्वचषक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत भारतानं रौप्य पदक जिंकलं आहे. मनू भाकर, सुरुची सिंग आणि सैन्यामया या तिघींच्या भारतीय संघानं महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तूल सांघिक प्रकारात हे पदक जिंकलं. या रौप्य पदकासह भारताची एकंदर पदक संख्या चारवर पोहोचली असून यात एक सुवर्ण आणि तीन रौप्य पदकांचा समावेश आहे.

आशियाई हॉकी

पंजाब मधील मोहाली इथे खेळल्या गेलेल्या नवव्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने जपानचा 4-1 असा पराभव करत अजिंक्यपद पटकावलं. भारताने ही स्पर्धा सलग तिसऱ्यांदा तर एकंदर सहाव्यांदा जिंकली. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल 'हॉकी इंडिया' नं प्रत्येक खेळाडूला 3 लाख रुपये आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना प्रत्येकी 1 लाख 50 हजार रुपयांचं रोख बक्षीस जाहीर केलं आहे.

रोनाल्डो-निवृत्ती

दिग्गज फुटबॉलपटू क्रिस्तियानो रोनाल्डो यानं आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यानं काल समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे ही माहिती दिली. 6 विश्वचषक, 1 युरोपीय अजिंक्यपद आणि आंतरराष्ट्रीय पुरुष फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल केल्याचा विक्रम रोनाल्डोच्या नावावर आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.